# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा
अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२१९८**

**अपिलार्थी श्री. नसीबुल्लाह शेख**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक (पूर्व व पश्चिम उपनगरे)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.११.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २५.०२.२०२३ | - | ०२.०३.२०२३ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २७.०४.२०२३ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय येथे दाखल केले आहे. महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय यांनी दि. १८.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर अपील राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ येथे हस्तांतरित केले आहे.

२. अपिलार्थींनी दि. २५.०२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांनी दि. २६.१२.२०२२ रोजी केलेल्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ०२.०३.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

४. सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे.

..२/-

५. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणातील उपलब्ध माहितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०१.१२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

प्रदीप व्यास
6-11-2025

**मुंबई**
**दिनांक : ०६.११.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ